# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)

सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७, फॅक्स :(०२२)२२१५१८६७. ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in


==================================================

## -: जाहिरात :-

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, आस्थापनेवर राज्यातील विविध ठिकाणी सेवानिवृत्त सहा. पोलीस आयुक्त (ACP), पोलीस निरिक्षक (PI) आणि सहा. पोलीस निरिक्षक / पोलीस उप निरिक्षक (API / PSI) दर्जाचे अधिकारी यांची अनुक्रमे संचालक - अभियान (Director - Operation), सह संचालक (Jt. Director) व संचालक (जनसंपर्क व वसुली) (Director (PRO & Recovery)), सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (SSO), आर्मोरर (Armorer) या पदांकरीता कंत्राटी तत्वावर नियुक्तीसाठी याव्दारे इच्छुक व पात्रताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सविस्तर जाहिरात यासोबत जोडलेली आहे.

Sd/-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

- **<u>प्रस्तावना:-</u>**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे शासनाचे वैधानिक महामंडळ आहे. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत केंद्र व राज्य शासनाची कार्यालये, त्यांचे उपक्रम, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, शासकीय किंवा निमशासकीय संस्था याद्वारे याबाबतीत स्वतंत्र तरतुदी करून निर्माण केलेले मोठे पुल, विशेष आर्थिक क्षेत्रे, खाजगी बंदरे व लहान धक्के, धरणे व द्रुतगती मार्ग इत्यादी पायाभुत सुविधांना आणि मॉल्स, मल्टिप्लेक्स, क्लब, हॉटेल इत्यादी यांसह वाणिज्यिक आस्थापनांना, सक्षम प्राधिकारी यांनी केलेल्या विशेष विनंतीवरून सुसज्जय मनुष्यबळामार्फत व्यावसायिक सेवा पुरवून त्यांचे अधिक चांगले संरक्षण करण्यासाठी व त्यांना सुरक्षा पुरविण्यासाठी अशा आस्थापनांना व संस्थांना तंत्रविषयक सल्ला देण्याकरीता मनुष्यबळामार्फत सुरक्षा व संरक्षण पुरविणे हे महामंडळाचे प्रमुख उद्दिष्टे आहे.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, आस्थापनेवर राज्यातील विविध ठिकाणी **सेवानिवृत्त सहा. पोलीस आयुक्त (ACP) दर्जाचे ०९ अधिकारी संचालक आणि सह संचालक (Director & Jt. Director / SSO) या पदावर, पोलीस निरिक्षक (PI) दर्जाचे ३४ अधिकारी आणि सहा. पोलीस निरिक्षक / पोलीस उप निरिक्षक (API / PSI) दर्जाचे ०३ अधिकारी सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (SSO) या पदावर अशा एकूण ४६** पदासाठी प्रस्तुत जाहिरात देण्यात येत असून इच्छुक व पात्र उमेदवारांनी महामंडळाच्या खालील नमुद पत्यावर अर्ज सादर करावेत.

- **<u>सह संचालक (Jt. Director) ०२ पदे :- पदासाठीचे वय, किमान अर्हता व निकष खालील प्रमाणे :-</u>**

**१. नोकरीचे ठिकाण :-**

१) **मुंबई विभाग :-** (दक्षिण मुंबई ते कर्जत / कसारा पर्यत.)

२) **नागपूर विभाग :-** (नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदीया, यवतमाळ, अमरावती)

**२. वय :-** दि. ३०.०९.२०२२ रोजी ६१ वर्षापेक्षा अधिक नसावे.

**३. किमान आवश्यक पात्रता :-**

- किमान शैक्षणिक अर्हता :- मान्यताप्राप्त विद्यापिठातून कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण.
- महाराष्ट्र राज्य पोलीस दलातून **<u>नि:शस्त्र सहा. पोलीस आयुक्त / पोलीस उप अधिक्षक</u>** या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.
- नागपूर व मुंबई विभागासाठी संबधीत विभागात राहत असलेले व त्याभागात पोलीस खात्यात असताना नोकरी केलेले उमेदवार यांना प्राधान्य देण्यात येईल.

**४. वेतन :- ५०,०००/-**

**५. <u>पदाची कर्तव्ये :-</u>**

१. सह संचालक हे संबधीत विभागातील सर्व आस्थापनांचे प्रभारी पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून काम करतील.
२. विभागांतर्गत विविध आस्थापनांमधील कार्यरत सुरक्षा कर्मी यांची कार्यक्षमता, शिस्त इ. विषयक बाबीवर त्यांनी लक्ष द्यावयाचे असून याबाबत वेळोवेळी योग्य ती कार्यवाहीसाठी मुख्यालयास अहवाल पाठविणे.
३. सह संचालक यांनी त्यांच्या विभागातील विविध आस्थापनांना नियमितपणे भेटी द्यावयाच्या आहेत. आस्थापनांचे व्यवस्थापनप्रमुख यांच्याकडून सुरक्षा रक्षकांच्या सेवेबाबत मते / तक्रारी समजून घेऊन त्यानुसार आवश्यक त्या सुचना सुरक्षा रक्षकांना देवून सुरक्षा व्यवस्था मजबूत व सक्षम राहील याची दक्षता घेणे. त्यासाठी व्यवस्थापन प्रमुखाच्या संपर्कात रहाणे.

४. आस्थापनांचे व्यवसाय स्वरूप व इतर बाबी विचारात घेवून सुरक्षा व्यवस्थेचा नियमित आढावा घेणे, आस्थापनांच्या सुरक्षा व संरक्षणात कसुरी असल्यास त्या दूर करण्याबाबत आस्थापना व महामंडळास याबाबत माहिती देवून सुधारणा सुचविणे.

५. स्थानिक पोलीस ठाणे व इतर शासकीय विभाग यांच्याकडून आणिबाणी प्रसंगी तात्काळ मदत मिळावी, या हेतूने त्यांच्याशी स्वत: तसेच आस्थापनांमध्ये पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून काम करत असलेल्या अधिकाऱ्यामार्फत संपर्कात रहावे.

६. आस्थापनांसोबतच्या सुरक्षा सेवेबाबत करावयाचे करार यांचे वेळेवर नुतनीकरणांसाठी आवश्यक ती कामे / पाठपुरावा करणे. त्यासाठी प्रतिष्ठापना विभागाचे प्रमुख यांना सहकार्य करणे.

७. आस्थापनांकडून दरमहा सुरक्षा शुल्क वेळेवर अदा व्हावे, यासाठी पर्यवेक्षकीय अधिकारी यांच्यामार्फतीने आणि वेळ प्रसंगी स्वत: हस्तक्षेप करून प्रयत्न करणे. प्रलंबीत देयक वसुलीसाठी मुख्यालयातील वित्त विभागाशी संपर्कात राहून पाठपुरावा करणे व त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे.

८. आपल्या विभागातील महामंडळ वादी / प्रतिवादी असलेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये महामंडळाच्या वतीने प्रतिनिधीत्व करणे. अशा प्रकरणांचा पाठपुरावा करणे व वरिष्ठांना वेळोवेळी अवगत करणे.

९. विभागांतर्गत व्यवसाय वृध्दीसाठी प्रयत्न करणे. त्यासाठी आस्थापनांना भेटी देणे. महामंडळाच्या सुरक्षा व्यवस्थेविषयी माहिती देणे.

१०. नवीन आस्थापनांचे सुरक्षा ऑडीट करणे व त्याबाबत मुख्यालयास अहवाल पाठविणे.

११. महामंडळाचे सुरक्षा रक्षक प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षण केंद्रावर उपस्थित राहून सहाय्य करणे.

१२. मा. व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी प्रसंगोपात दिलेले आदेशानुसार कामे करणे.

===

- **<u>सह. संचालक (Jt. Director) तथा सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (SSO) ०४ पदे :- पदासाठीचे वय, किमान अर्हता व निकष खालील प्रमाणे :-</u>**

**१. नोकरीचे ठिकाण (आस्थापना) :-**

१) महामुंबई मेट्रो :- (डहाणूकरवाडी, कांदीवली ते आरे स्टेशन, गोरेगाव)

२) जुहू एअरपोर्ट.

३) मुंबई - पुणे एक्सप्रेस वे.

४) जे. जे. रुग्णालय, मुंबई.

**२. वय :-** दि. ३०.०९.२०२२ रोजी ६१ वर्षापेक्षा अधिक नसावे. तथापि, महामंडळात यापूर्वी सेवा केलेले व दि. ३०.०९.२०२२ रोजी पर्यत वय वर्ष ६५ पेक्षा कमी असलेले अधिकारी यांच्या बाबतीत त्यांचा महामंडळातील सेवा कालावधी व अनुभव विचारात घेऊन त्यांना वयामध्ये सवलत व प्राधान्य देण्यात येईल.

**३. किमान आवश्यक पात्रता :-**

- किमान शैक्षणिक अर्हता :- मान्यताप्राप्त विद्यापिठातून कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण.
- महाराष्ट्र राज्य पोलीस दलातून **<u>नि:शस्त्र सहा. पोलीस आयुक्त / पोलीस उप अधिक्षक</u>** या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.
- मुंबई, ठाणे, पालघर, नवी मुंबई या भागात नोकरी केलेले व याच भागात सध्या राहत असलेले उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

**४. वेतन :- ५०,०००/-**

**५. <u>पदाची कर्तव्ये :-</u>**

१. आस्थापनामध्ये नियुक्त केलेले महामंडळाचे सुरक्षा कर्मी यांच्यावर दैनंदिन पर्यवेक्षण व नियंत्रण करणे.
२. आस्थापनेस असलेले संभाव्य धोके यानुसार सुरक्षा कर्मी यांना कायम सतर्क ठेवणे व त्यांच्याकडून कार्यक्षमपणे काम करून घेणे.
३. उत्कृष्ट काम करणारे सुरक्षा कर्मी यांना प्रोत्साहन देणेकामी प्रशंस्तीपत्र / बक्षीसे देण्याबाबत मुख्यालयास अहवाल सादर करणे.
४. कर्तव्यात कसुरी करणारे सुरक्षा कर्मी यांचे कसुरी अहवाल चौकशीअंती कार्यवाहीसाठी मुख्यालयास सादर करणे.
५. सुरक्षा कर्मीची दैनंदिन हजेरी घेणे व त्याची HRMS प्रणालीमध्ये नोंदी घेणे.
६. हत्यारी सुरक्षा रक्षक यांच्याकडील हत्यारांची देखभाल दुरूस्ती विषयक आर्मोरर कडून कामे करून घेणे.
७. आस्थापनेकडून सुरक्षा शुल्क वेळेत वसुल करण्याबाबत कार्यवाही करणे, प्रलंबित देयके संदर्भात उपस्थित अडी - अडचणी याबाबत संबधीत आस्थापना आणि महामंडळाचे मुख्यालय यांच्याशी समन्वय साधून प्रलंबित देयक वसुलीचे काम करणे.
८. आस्थापनेसोबत करण्यात आलेल्या कराराचे नुतनीकरणाबाबत पाठपुरावा करणे.
९. मा. व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी प्रसंगोपात दिलेले आदेशानुसार कामे करणे.

===

- **<u>संचालक - भरती व प्रशिक्षण (Director - Recruitment & Training ) ०१ पद :- पदासाठीचे वय, किमान अर्हता व निकष खालील प्रमाणे :-</u>**

**१. नोकरीचे ठिकाण :- महामंडळाचे मुख्यालय, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई**

**२. वय :-** दि. ३०.०९.२०२२ रोजी ६१ वर्षापेक्षा अधिक नसावे. तथापि, महामंडळात यापूर्वी सेवा केलेले व दि. ३०.०९.२०२२ रोजी पर्यत वय वर्ष ६५ पेक्षा कमी असलेले अधिकारी यांच्या बाबतीत त्यांचा महामंडळातील सेवा कालावधी व अनुभव विचारात घेऊन त्यांना वयामध्ये सवलत व प्राधान्य देण्यात येईल.

**३. किमान आवश्यक पात्रता :-**

- किमान शैक्षणिक अर्हता :- मान्यताप्राप्त विद्यापिठातून कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण.
- महाराष्ट्र राज्य पोलीस दलातून **<u>नि:शस्त्र सहा. पोलीस आयुक्त / पोलीस उप अधिक्षक</u>** या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.
- मुंबई, ठाणे, पालघर, नवी मुंबई या भागात नोकरी केलेले व याच भागात सध्या राहत असलेल्या उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल.

**४. वेतन :- ५०,०००/-**

**५. पदाची कर्तव्ये :-**

- **भरती विभाग :-**

१. भरती प्रक्रिया नियमावली व त्याप्रमाणे भरती प्रक्रिया राबविणे.

२. सुरक्षा रक्षकांची भरती प्रक्रिया संबधीत उमेदवारांचे किमान निकष पडताळणी विषयक कामकाज.

३. उमेदवारांची वैद्यकिय तपासणी विषयक कामकाज.

४. उमेदवारांचे अर्ज पडताळणी व त्याप्रमाणे नोंदणी करणे.

५. पात्र उमेदवारांची गुणानुक्रमे अंतिम यादी तयार करणे.

६. निवड केलेल्या उमेदवारांची HRMS प्रणालीमध्ये, महामंडळाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे.

७. महामंडळास आवश्यक ती हत्यारे खरेदी करणे, आस्थापनेच्या मागणीनुसार वेळोवेळी हत्यारे व दारुगोळा पुरवठा करणे, विविध कोतमधील हत्यारांची तपासणी, देखभाल, दुरूस्ती विषयक कामकाज, हत्यारे व दारुगोळा यांचा हिशोब ठेवणे.

- **प्रशिक्षण विभाग :-**

१. अंतिम यादीतील उमेदवारांना महामंडळाने निर्धारीत केलेल्या कालावधीसाठी राज्य पोलीस दल / राज्य राखीव पोलीस दल यांच्या प्रशिक्षण केंद्रामधून प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे उपलब्ध करून घेण्यासाठी पत्रव्यवहार व इतर अनुषंगिक कामे.

२. प्रशिक्षण केंद्रास प्रशिक्षण अभ्यासक्रम पाठविणे.

३. उमेदवारांचे प्रशिक्षण शुल्क, जेवण व इतर बाबींसंदर्भात कार्यवाही.

४. उमेदवारांकडून प्रशिक्षण शुल्क घेणेबाबतचे काम.

५. कार्यरत सुरक्षा कर्मीचे उजळणी प्रशिक्षण, अभ्यासक्रम, त्याबाबतच्या उपाययोजना याबाबत वेळेवर कार्यवाही करणे.

६. प्रशिक्षणार्थी / सुरक्षा कर्मीना गणवेश व पीटी किटस संदर्भात निर्धारीत रक्कम विहीत नियमान्वये अदा करण्यासाठी उमेदवारांची यादी लेखा विभागास सादर करणे.

७. प्रशिक्षण शुल्क संबधीत प्रशिक्षण केंद्राना विहित वेळेत अदा करण्याविषयी कार्यवाही करणे व त्याबाबत Tax Invoice प्राप्त करणे.

८. मा. व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी प्रसंगोपात दिलेले आदेशानुसार कामे करणे.

===

- **संचालक (जनसंपर्क तथा वसुली) Director - (PRO / Recovery) - ०१ पद :- पदासाठीचे वय, किमान अर्हता व निकष खालील प्रमाणे :-**

**१. नोकरीचे ठिकाण :- महामंडळाचे मुख्यालय, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई.**

**२. वय :-** दि. ३०.०९.२०२२ रोजी ६१ वर्षापेक्षा अधिक नसावे. तथापि, महामंडळात यापूर्वी सेवा केलेले व दि. ३०.०९.२०२२ रोजी पर्यत वय वर्ष ६५ पेक्षा कमी असलेले अधिकारी यांच्या बाबतीत त्यांचा महामंडळातील सेवा कालावधी व अनुभव विचारात घेऊन त्यांना वयामध्ये सवलत व प्राधान्य देण्यात येईल.

**३. किमान आवश्यक पात्रता :-**

- किमान शैक्षणिक अर्हता :- मान्यताप्राप्त विद्यापिठातून कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण.
- महाराष्ट्र राज्य पोलीस दलातून **नि:शस्त्र सहा. पोलीस आयुक्त / पोलीस उप अधिक्षक** या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.

**४. इतर :-**

- मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेतून नस्तीलेखन, / ड्राफ्टींग करण्याची क्षमता व अनुभव आवश्यक
- मराठी व इंग्रजी टायपिंगसह संगणक हाताळणीचे ज्ञान / अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

**५. वेतन :- ५०,०००/-**

**६. पदाची कर्तव्ये :-**

१. महामंडळाची व्यावसायिक सुरक्षा सेवा घेतलेल्या विविध आस्थापना यांच्याकडून नियमितपणे सुरक्षा शुल्क वसुलीचे काम.

२. सुरक्षा शुल्क थकविणाऱ्या आस्थापनांशी व्यावसायिक पध्दतीने संवाद ठेवणे व शुल्क वसुली करणे.

३. शुल्क वसुलीसाठी आस्थापनांना वेळोवेळी भेटी देणे व त्यामधील अडी- अडचणी समजावून घेऊन त्यावर योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी वरिष्ठांना मदत करणे.

४. प्रलंबित शुल्काबाबत वरिष्ठांना वेळोवेळी अहवाल सादर करणे.

५. मा. व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी प्रसंगोपात दिलेले आदेशानुसार कामे करणे.

===

- **संचालक - अभियान (Director - Operation ) ०१ पद :- पदासाठीचे वय, किमान अर्हता व निकष खालील प्रमाणे :-**

**१. नोकरीचे ठिकाण :- महामंडळाचे मुख्यालय, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई.**

**२. वय :-** दि. ३०.०९.२०२२ रोजी ६१ वर्षापेक्षा अधिक नसावे. तथापि, महामंडळात यापूर्वी सेवा केलेले व दि. ३०.०९.२०२२ रोजी पर्यत वय वर्ष ६५ पेक्षा कमी असलेले अधिकारी यांच्या बाबतीत त्यांचा महामंडळातील सेवा कालावधी व अनुभव विचारात घेऊन त्यांना वयामध्ये सवलत व प्राधान्य देण्यात येईल.

**३. किमान आवश्यक पात्रता :-**

- किमान शैक्षणिक अर्हता :- मान्यताप्राप्त विद्यापिठातून कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण.
- महाराष्ट्र राज्य पोलीस दलातून **निशस्त्र सहा. पोलीस आयुक्त / पोलीस उप अधिक्षक** या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.

**४. वेतन :- ५०,०००/-**

**५. पदाची कर्तव्ये :-**

१. विविध आस्थापनेकडून किंवा अन्य मार्गाने सुरक्षा कर्मीच्या कर्तव्याबाबत प्राप्त झालेले तक्रारी व त्यावरून पर्यवेक्षकीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले कसुरी अहवाल यांची शहानिशा करणे व नस्तीव्दारे योग्य त्या कार्यवाहीकरीता वरिष्ठांकडे सादर करणे.

२. आस्थापनेवरील सुरक्षा कर्मी यांनी कर्तव्यावर असताना केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबाबत प्राप्त अहवालांची नस्ती तयार करून वरिष्ठांकडे सादर करणे.

३. आस्थापनेवर कार्यरत असलेले सुरक्षा अधिकारी यांच्याकडून सुरक्षा कर्मीच्या गैरहजेरीबाबतचा अहवाल प्राप्त करून वरिष्ठांकडे सादर करणे.

४. विनापरवाना दिर्घकाळ कर्तव्यावर गैरहजर असलेले व आज्ञांकित कक्षामध्ये हजर होण्यास आलेल्या सुरक्षा कर्मीच्या कागदपत्राची पडताळणी करून वरिष्ठांकडे सादर करणे.

५. मा. पोलीस अधिक्षक (अभियान) यांचे आस्थापना भेटीचे अहवाल तयार करणे.

६. सुरक्षा कर्मी यांचे चांगल्या कामाबाबत दयावयाचे प्रशंसतीपत्र

७. RTI संदर्भात प्राप्त झालेल्या अर्जाबाबत योग्य ती माहिती प्रशासन विभागास सादर करणे.

८. आस्थापनांवर कार्यरत पर्यवेक्षकीय अधिकारी यांच्या साप्ताहिक कामकाजाबाबत साप्ताहिक डायरी प्राप्त करून ती वरिष्ठांकडे सादर करणे.

९. मा. व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी प्रसंगोपात दिलेले आदेशानुसार कामे करणे.

===

- **आर्मोरर (Armorer) ०१ पद :- पदासाठीचे वय, किमान अर्हता व निकष खालील प्रमाणे :-**

**१. नोकरीचे ठिकाण :-** महामंडळाचे मुख्यालय, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई

**२. वय :-** दि. ३०.०९.२०२२ रोजी ६१ वर्षापेक्षा अधिक नसावे.

**३. किमान आवश्यक पात्रता :-**

- महाराष्ट्र राज्य पोलीस दलातून **शस्त्रत्र सहा. पोलीस निरिक्षक / पोलीस उप निरिक्षक** या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.
- विविध प्रकारचे अग्नीशस्त्र (.३०३, ४१० मस्केट, १२ बोअर पंप ॲक्शन शॉट गन, SLR, पिस्टल, रिवॉल्वर इ.) हाताळणी, दुरूस्ती, खोलना-जोडना इ. चे अनुभव आवश्यक आहे.
- मुंबई, ठाणे, पालघर, नवी मुंबई या भागात नोकरी केलेले व याच भागात सध्या राहत असलेले उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

**४. वेतन :- ३५,०००/-**

**५. पदाची कर्तव्ये :-**

१. महामंडळाकडे असलेली हत्यारे यांची देखभाल, साफसफाई, दुरूस्ती तसेच हत्यारे व दारूगोळा विविध आस्थापनांना वाटप करणे, कोतमधील हत्यारांची निगा राखणे व सर्व हत्यारांचा सातत्यपूर्ण गोषवारा तयार करणे.

२. विविध आस्थापनेवर पुरविण्यात आलेली हत्यारे व दारुगोळा यांची आस्थापनेवर जाऊन योग्य ती तपासणी, साफसफाई व दुरूस्ती करणे.

३. महामंडळास आवश्यक असणारी हत्यारे व दारूगोळा खरेदी करणे किंवा विविध पोलीस घटकांकडून प्राप्त करून घेणे यासंदर्भातील कामे करणे.

४. मा. व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी प्रसंगोपात दिलेले आदेशानुसार कामे करणे.

===

- **सहा. संचालक (Asst. Director) / सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (Security Supervisory Officer) ३६ पदे :- नोकरीचे ठिकाण, पदासाठीचे वय, किमान अर्हता व निकष खालील प्रमाणे :-**

**१. नोकरीचे ठिकाण** (आस्थापना) **:- खालील तक्त्यात नमुद प्रमाणे.**

| अ. क्र | आस्थापना | पद संख्या | अ. क्र | आस्थापना | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक विभाग ( नासिक, धुळे, जळगाव, नंदूरबार जिल्हे) | **०१** | १६ | इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर | **०१** |
| २ | महामुंबई मेट्रो - (डहाणूकरवाडी, कांदीवली ते आरे स्टेशन, गोरेगाव) | **०४** | १७ | मिहान विमानतळ, नागपूर | **०१** |
| ३ | मिरा - भाईंदर महानगरपालिका | **०४** | १८ | जिल्हा सत्र न्यायालय, सोलापूर | **०१** |
| ४ | सेंट जॉर्ज हॉस्पीटल, मुंबई | **०१** | १९ | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, सांगली | **०१** |
| ५ | जी. टी. हॉस्पीटल, मुंबई | **०१** | २० | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, सोलापूर | **०१** |
| ६ | ओएनजीसी उरण | **०१** | २१ | औष्णिक विद्युत केंद्र, परळी | **०१** |
| ७ | गेल इंडिया, उसर, अलिबाग | **०१** | २२ | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, यवतमाळ | **०१** |
| ८ | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, कोल्हापूर | **०१** | २३ | भारत पेट्रोलियम - आरसीएफ, मुंबई | **०१** |
| ९ | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, मिरज | **०१** | २४ | विमानतळ प्राधिकरण, विले - पार्ले - मुंबई | **०१** |
| १० | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, लातूर | **०१** | २५ | कामा हॉस्पीटल, मुंबई | **०१** |
| ११ | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अंबेजोगाई | **०१** | २६ | ओएनजीस बी. के. सी. | **०१** |
| १२ | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला | **०१** | २७ | टोरेंट पॉवर, कळवा, ठाणे | **०१** |
| १३ | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, धुळे | **०१** | २८ | कांदळवन घटक, मुंबई | **०१** |
| १४ | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, नांदेड | **०१** | २९ | रिलायन्स गॅस पाईप लाईन, प्रा. लि., पातळगंगा / रसायणी | **०१** |
| १५ | बी. जे. वैद्यकिय महाविद्यालय, पुणे | **०१** | ३० | रिलायन्स गॅस पाईप लाईन, प्रा. लि., नागोठाणे, रायगड | **०१** |
| | **एकूण** | | | | **३६** |

**२. वय :-** दि. ३०.०९.२०२२ रोजी ६१ वर्षापेक्षा अधिक नसावे. तथापि, महामंडळात यापूर्वी सेवा केलेले व दि. ३०.०९.२०२२ रोजी पर्यत वय वर्ष ६५ पेक्षा कमी असलेले अधिकारी यांच्या बाबतीत त्यांचा महामंडळातील सेवा कालावधी व अनुभव विचारात घेऊन त्यांना वयामध्ये सवलत व प्राधान्य देण्यात येईल.

**३. किमान आवश्यक पात्रता :-**

- किमान शैक्षणिक अर्हता :- मान्यताप्राप्त विद्यापिठातून कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण.
- तक्त्यातील **अ. क्र. ०१ ते २८** मध्ये नमुद पदासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस दलातून **नि:शस्त्र पोलीस निरिक्षक** या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.
- तक्यातील **अ. क्र. २९ व ३०** मध्ये नमुद पदासाठी किमान शैक्षणिक अर्हता इ. १२ वी पास व महाराष्ट्र राज्य पोलीस दलातून **नि:शस्त्र सहा. पोलीस निरिक्षक किंवा पोलीस उप निरिक्षक** या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.
- वरील पदे राज्यातील विविध भागात असून त्या-त्या विभागात नोकरी केलेले व त्याच भागात सध्या राहत असलेले उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

**४. वेतन :- १) तक्त्यामधील अ. क्र. ०१ ते २८ - रू. ४५,०००/- तर,**

**२) अ. क्र. २९ व ३० - रू. ३५,०००/-**

- **पदाची कर्तव्ये :-**

१. आस्थापनामध्ये नियुक्त केलेले महामंडळाचे सुरक्षा कर्मी यांच्यावर दैनंदिन पर्यवेक्षण व नियंत्रण करून आस्थापनेची सुरक्षा व संरक्षणाची जबाबदारी पार पाडणे.

२. आस्थापनेस असलेले संभाव्य धोके यानुसार सुरक्षा कर्मी यांना कायम सतर्क ठेवणे व त्यांच्याकडून कार्यक्षमपणे काम करून घेणे.

३. उत्कृष्ट काम करणारे सुरक्षा कर्मी यांना प्रोत्साहन देणेकामी प्रशंस्तीपत्र / बक्षीसे देण्याबाबत मुख्यालयास अहवाल सादर करणे.

४. कर्तव्यात कसुरी करणारे सुरक्षा कर्मी यांचे कसुरी अहवाल चौकशीअंती कार्यवाहीसाठी मुख्यालयास सादर करणे.

५. सुरक्षा कर्मीची दैनंदिन हजेरी घेणे व त्याची HRMS प्रणालीमध्ये नोंदी घेणे.

६. हत्यारी सुरक्षा रक्षक यांच्याकडील हत्यारांची देखभाल दुरूस्ती विषयक आर्मोरर कडून कामे करून घेणे.

७. आस्थापनेकडून सुरक्षा शुल्क वेळेत वसुल करण्याबाबत कार्यवाही करणे, प्रलंबित देयके संदर्भात उपस्थित अडी - अडचणी याबाबत संबधीत आस्थापना आणि महामंडळाचे मुख्यालय यांच्याशी समन्वय साधून प्रलंबित देयक वसुलीचे काम करणे.

८. त्याचप्रमाणे महामंडळाचे मुख्यालयाकडून सोपविण्यात आलेले अनुषंगिक कामकाज करणे.

९. मा. व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी प्रसंगोपात दिलेले आदेशानुसार कामे करणे.

**२) <u>अर्ज सादर करण्याची पध्दत :-</u>**

१. इच्छुक व पात्र उमेदवार यांनी यासोबतच्या विहित नमुन्यातील आपला अर्ज महामंडळास खालील पत्यावर प्रत्यक्ष हजर राहून / पोस्टाने / महामंडळाच्या खालील नमुद ई - मेलआयडीवर पाठविण्यात यावा.

२. अर्ज सादर करण्याचा पत्ता व ई -मेल आयडी.

**पत्ता :-** पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

दूरध्वनी : (०२२) २२१५ १८४७, फॅक्स :(०२२) २२१५१८६७.

**ई - मेल आय डी** :- **empanelment.mssc@gmail.com**

**अर्ज सादर करण्याचा कालावधी व मुदत :-**

अर्ज सादर करण्याची शेवटची दिनांक :- **१६.०९.२०२२ पर्यत वेळ १८.०० वाजेपर्यंत.**

**३) मुलाखतीसाठी हजर रहावयाचे ठिकाण व दुरध्वनी क्र. :-**

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

दूरध्वनी : (०२२) २२१५ १८४७, फॅक्स :(०२२) २२१५१८६७.

**४) मुलाखतीवेळी उमेदवारांनी सादर करावयाची कागदपत्रे :-**

१) वैयक्तिक माहिती (BIO-DATA)
२) शैक्षणिक कागदपत्रे
३) सेवानिवृत्त प्रमाणपत्र / सेवानिवृत्ती ओळखपत्र
४) निवृत्ती वेतन पुस्तिकेची प्रत
५) फोटो / पॅन कार्ड / आधार कार्ड

**६) इतर महत्वाच्या सुचना :-**

१. उमेदवारांनी सोबतच्या विहित केलेल्या नमुन्यात त्यांचे अर्ज / BIO-DATA पोस्टाने किंवा वर नमुद केलेल्या ई-मेल आयडीवर PDF स्वरूपात सादर करावेत.

२. उमेदवारांच्या प्राप्त कागदपत्रानुसार मुलाखतीसाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. किमान अर्हता प्राप्त उमेदवारांना मुलाखतीची वेळ दिनांक याबाबत भ्रमणध्वनी तसेच ई-मेलव्दारे कळविण्यात येईल.

३. मुलाखतीसाठी उमेदवारांना स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

४. मुलाखतीसाठी येताना सेवानिवृत्ती ओळखपत्र, पेन्शन पुस्तिका व शैक्षणिक अर्हता विषयक सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती, BIO-DATA व त्याच्या ०२ छायांकित प्रती आणाव्यात.

५. मुलाखत, अनुभव इ. वर आधारित उमेदवारांची नामिकासुची तयार करण्यात येईल आणि महामंडळात उपलब्ध जागेनुसार या सुचीमधील गुणानुक्रम विचारात घेऊन नियुक्ती दिली जाईल.

६. निवडलेल्या उमेदवारास महामंडळाच्या अटी व शर्तीसह नियुक्ती पत्र दिले जाईल.

७. दिली जाणारी नियुक्ती ही करार पध्दतीने ११ महिन्यासाठी असेल व महामंडळाची आवश्यकता आणि प्रस्तुत कर्मचाऱ्यांची क्षमता, आत्मसात केलेले ज्ञान व इतर निकष यानुसार पुर्ननियुक्ती दिली जाईल.

८. प्रस्तुत जाहिरातीत नमुद करण्यात आलेली पदसंख्या यामध्ये वाढ / घट होण्याची शक्यता आहे.

९. सदर निवड प्रक्रिया कोणत्याही वेळी / कोणत्याही कारणास्तव / कोणत्याही टप्प्यावर / पुर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा / फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१०. उमेदवारांच्या नेमणुकीबाबत अंतिम निर्णय महामंडळाचा असेल.

**Sd/-**
**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**

## Format for Application:

Attach recent Photography

# Application Form

(Please read the general instructions, Terms & Conditions in the advertisement before filling the form)

To,
The Managing Director,
Maharashtra State Security Corporation,
32 Floor, World Trade Center,
Cuff Parade, Mumbai - 400 005.

**Sub.** : Application for the post of ________________________________________.
(Mention the name of post)
**Ref.** : Advertisement dated - ____________________

Sir,

I hereby submit my application for the post of ______________________ with the following details:

1. Full name (As mentioned in the service books) – ________________________________________
________________________________________________________________________

2. Date of Birth - ________________________________________

3. Permanent Address - ________________________________________
________________________________________
________________________________________
________________________________________

4. Correspondence Address - ________________________________________
________________________________________
________________________________________
________________________________________

5. Mobile Number - ________________________________________
6. Marital Status - ________________________________________
7. Gender - ________________________________________

8. Email id - ________________________________________

9. Date of Joining Police - ________________________________________
Department & Post - ________________________________________

10. Date of Retirement - ______________________________

11. Last Basic drawn - ______________________________

12. Education Qualifications - ______________________________

| Sr. No. | Qualification | Name of the institute | Board/ University | Year of Passing | Percentage | Class |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | SSC or Diploma | | | | | |
| 2. | HSC | | | | | |
| 3. | Graduation (B.A, BSc, B.Com etc.) | | | | | |
| 4. | Post-Graduation/ Other Qualification if any | | | | | |

**3.<u>Details of Postings :- (Mention last 15 years posting only)</u>**

| Sr. No. | Name of the Police Station / Division | Post (PSI / API / PI / ACP) | Period from to |
|---|---|---|---|
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5 | | | |

Total Service / Experience: ____________ Y (Year) ________M (Months) ___________ D (days)

14. Total Rewards :- ______________________________

15. Punishments if any :- 1) Minor :- ______________________________

2) Major :- ______________________________

16. Details of pending departmental enquires if any :- ______________________________

17. Details of criminal cases if any and Status of the case :- ______________________________

______________________________________________________________

## Declaration

I have read carefully all instructions given in the advertisement on the website of the State Govt. & MSSC, Mumbai. I, hereby, declare that, all information mentioned in this application and in its accompaniments is true, complete and correct to the best of my knowledge and belief. I know and accept that in the event of any information being found false, incomplete, or incorrect, my candidature/ appointment is liable to be cancelled/ terminated at any stage.

Date :

Place

(Signature of Applicant)

**Enclosures :**

********